# पंचायती राज समिती

# (२०१०-२०११)

# (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

## सांगली, ठाणे जिल्हा परिषदांच्या सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

# दुसरा अहवाल

एचबी-२२२६-१अ.

# पंचायती राज समिति

## (२०१०-२०११)

**समिती प्रमुख**

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

**समिती सदस्य**

२ ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

३ श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७ श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८ श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९ श्री. उदय सामंत, वि.स.स.

१० श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११ श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२ श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५ श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२० श्री. नितीन भोसले, वि.स.स.

२१ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२ *रिक्त

२३ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

२४ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव,

श्री. विलास आठवले, अवर सचिव

श्री. सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी.

---

*सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे, वि. प. स., यांची दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त.

# पंचायती राज समिति

## (२००८-२००९)

**समिति प्रमुख**

१. श्री. सुभाष ठाकरे, वि.स.स.

**समिति सदस्य**

*२. श्री. राजन पाटील, वि.स.स.

३. श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.

४ श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

५ श्री. संपतराव अवघडे, वि.स.स.

६ श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

**७ रिक्त

८ श्री. पी.एन.पाटील, वि.स.स.

९ श्री. सुभाष बने, वि.स.स.

१० श्री. रार्जेंद्र मुळक, वि.स.स.

११ श्री. पद्माकर वळवी, वि.स.स.

१२ श्री. डी.एस.अहिरे, वि.स.स.

१३ श्री. आशिष जयस्वाल, वि.स.स.

१४ श्री. तुकाराम सुर्वे, वि.स.स.

१५ श्री. अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

१६ श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

१७ श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८ श्री. टी. पी. कांबळे, वि.स.स.

१९ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

२० श्री. हेमंत पटले, वि.स.स.

२१ श्री. राजन तेली, वि.प.स.

२२ श्री. एम.एम.शेख, वि.प.स.

२३ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२४ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

२५ श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव,

श्री. वि.वा.देशमुख, उप सचिव,

श्री. ता. नि. मिसाळ, अवर सचिव,

# पंचायती राज समिती

## (२००७-२००८)

**समिती प्रमुख**

१. श्री. राजन पाटील, वि.स.स.

**समिती सदस्य**

२. श्री. नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.

३. श्री. दिलीप बनसोड, वि.स.स.

४ श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स.

५ श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

६ श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

*७ श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.

८ ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

९ श्री. सुभाष बने, वि.स.स.

१० श्री. राजेंद्र मुळक,वि.स.स.

११ श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

१२ श्री. सुनिल केदार, वि.स.स.

१३ श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.

१४ श्री. कैलास पाटील, वि.स.स.

१५ श्री. विश्वास नांदेकर, वि.स.स.

१६ श्री. संजय राठोड, वि.स.स.

१७ श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८ श्री. उत्तम इंगळे, वि.स.स.

१९ श्री. साहेबराव घोडे, वि.स.स.

२० श्री. सदाशिव लोखंडे, वि.स.स.

---

* सन्माननीय सदस्य श्री. दिलीपकुमार सानंदा यांनी पंचायती राज समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर दिनांक २४ जुलै, २००७ रोजी श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली.

**२१ रिक्त

२२ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

२३ श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स.

२४ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

२५ श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव,

श्री. वि.वा.देशमुख, उप सचिव,

---

** श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांची दिनांक २४ फेब्रुवारी, २००८ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे पद रिक्त आहे.

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा दुसरा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१०-२०११ करिता समिती दिनांक ४ मार्च, २०१०, रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने सांगली व ठाणे या जिल्हा परिषदांची सखोल तपासणी केली.

समितीने सांगली जिल्हा परिषदेस दिनांक २१, २२ व २३ ऑगस्ट, २००७ रोजी भेट देऊन श्री.गोकूळ मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.रविंद्र शेळके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सांगली जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने ठाणे जिल्हा परिषदेस दिनांक २३, २४ व २५ ऑक्टोबर, २००७ रोजी भेट देऊन श्री.सु.रा.हजारे, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.रविंद्र सावंत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २००८-२००९ करिता गठीत झालेल्या समितीने सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २६ जून, २००९ रोजी मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

सन २०१०-२०११ करिता गठीत झालेल्या समितीने ठाणे परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ११ मे व १२ मे, २०१० रोजी मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीचेवेळी श्री.बलदेव सिंह, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग, श्रीमती शर्वरी गोखले, अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.संजय कुमार, सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या सांगली व ठाणे या जिल्हा परिषदांच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१०-२०११ साठी गठित झालेल्या समितीने दिनांक ९ डिसेंबर, २०१० रोजी च्या बैठकीत अहवाल विचारात घेऊन संमत केला.

| | |
|---|---|
| विधान भवन : | **बबनराव शिंदे,** |
| नागपूर, | समिती प्रमुख, |
| दिनांक : ९ डिसेंबर, २०१०. | पंचायती राज समिती. |

# अनुक्रमणिका



| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| | | प्रस्तावना | (सात) |
| | | **प्रकरण एक** | |
| | | **सांगली जिल्हा परिषद** | |
| १ | १.१ | पंचायत समिती आटपाडी अंतर्गत प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीचे काम अपूर्ण असणे | १ |
| | १.२ | भांडी खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार | ६ |
| | | **प्रकरण दोन** | |
| | | **ठाणे जिल्हा परिषद** | |
| २ | २.१ | पंचायत समिती शहापूर अंतर्गत असलेली गैरव्यवहाराची प्रकरणे. | १० |
| | २.२ | ग्रामिण पाणीपुरवठ्याच्या अपूर्ण योजनाबाबत. | १५ |
| ३ | परिशिष्ट | समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त | २५ |

# प्रकरण एक

# सांगली जिल्हा परिषद

## १.१ पंचायत समिती, आटपाडी अंतर्गत प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीचे काम अपूर्ण असणे.

समितीने दिनांक २२ ऑगस्ट २००७ रोजी सांगली जिल्ह्यातील पंचायत समिती आटपाडी येथे भेट देऊन प्रश्नावली क्रमांक २ च्या संदर्भात गट विकास अधिकारी, आटपाडी यांची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती आटपाडी अंतर्गत किती प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीची कामे अपूर्ण आहेत. त्यावर तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी एका उपकेंद्राची इमारत अपूर्ण आहे तसेच उपअभियंता (बांधकाम) यांनी इमारतीच्या विद्युतीकरणाचे काम अपूर्ण राहिले आहे असे सांगितले. समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही इमारत केव्हा बांधून पुर्ण झाली. त्यावर उपअभियंता यांनी माहे मार्च, २००६ च्या दरम्यान पूर्ण झाली असल्याचे समितीला सांगितले. विद्युतीकरणाच्या कामावर किती खर्च करण्यात आला व विद्युतीकरणाचे काम किती दिवसापासून अपूर्ण आहे. असे समितीने विचारले असता उप अभियंता यांनी असे सांगितले की, दिनांक १० मार्च १९९६ रोजी उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम सुरू केले होते. या कामासाठी प्रशासकीय मंजुरी रुपये ३,९५,४२८ एवढ्या रक्कमेची होती व त्यावर एकूण रुपये ३,३९,८२६ इतका खर्च झाला. काही किरकोळ बाबी उदा. रंगकाम तसेच ड्रेनेजचे काम अपूर्ण होते. ठेकेदाराने काम अर्धवट सोडून दिले. त्यांना वारंवार नोटीस देऊनही त्यांनी काम पूर्ण केले नाही.

याबाबत समितीने पुढे अशी विचारणा केली की, ५९० चौ.फुट बांधकाम करण्यासाठी सन १९९६ पासून २००६ पर्यंतचा कालावधी लागला तरीदेखील विद्युतीकरणाचे काम पुर्ण झालेले नाही. उपकेंद्राची इमारत अपुर्णावस्थेत पडून आहे, याची जबाबदारी कोणाची आहे. त्यावर उप अभियंता यांनी असा खुलासा केला की, विद्युतीकरणासाठी ३५,००० रुपये लागणार असल्याने त्यासाठी आरोग्य विभागाकडून निधी मागविण्यात आला होता त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मूळ अंदाज पत्रकामध्ये विद्युतीकरणाच्या कामाचा समावेश नव्हता, तसेच संबंधित ठेकेदाराने ८० टक्के काम केल्यानंतर पुढील काम सोडून दिले. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले किंवा नाही, याबाबत समितीला अशी माहिती दिली की, तशा प्रकारचा प्रस्ताव दिनांक १० जुलै, २००२ रोजी विभागीय कार्यालयाकडे सादर केला असता विभागीय कार्यालयाने त्यांना नोटीस दिली मात्र त्यानंतर आजतागायत विभागीय कार्यालयाने त्यांच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. ही बाब ध्यानात घेता यामध्ये विभागीय कार्यालयाचा दोष असल्याचे

समितीचे मत झाले, त्यानंतर समितीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यासंदर्भात नोंद घेऊन संबंधित अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस द्यावी अशी सूचना केली तसेच आरोग्य विभागाकडून रुपये ३५,००० इतका निधी उपलब्ध होण्यामध्ये अडचण आहे काय,अशी विचारणा केली असता त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काही अडचण नसून तीन महिन्यात उर्वरित काम पूर्ण करुन घेऊ आणि लोकांच्या सेवेसाठी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र उपलब्ध केले जाईल असे समितीला सांगितले. त्यावर समितीने यासंदर्भातील पूर्तता अहवाल समितीला सादर करावा असे निदेश दिले.

**उपरोक्त महितीच्या आधारे समितीने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी खालील मुद्यांची माहिती मागविली.--**

पंचायत समिती आटपाडी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीमध्ये विद्युतीकरणाचे काम अपूर्ण असल्याची कारणे काय आहेत निविदेमध्ये विद्युती करणाच्या कामाचा समावेश नव्हता काय याबाबत सविस्तर खुलासा करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, सांगलीकडून खालील माहिती प्राप्त झाली.--**

मुळ अंदाजपत्रकात विद्युतीकरणाच्या कामाचीबाब अंर्तभूत नव्हती तसेच मुळ निविदेमध्ये विद्युतीकरण कामाचा समावेश नव्हता मुळ इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर विद्युतीकरण करण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता दिनांक १५-१२-२००७ ला प्राप्त झाली तद्नंतर विद्युतीकरण कामास दिनांक २४-१-२००८ रोजी कार्यारंभ आदेश देऊन दिनांक २६-३-२००८ रोजी काम पूर्ण झाले आहे. सदर इमारतीचा ताबा दिनांक २६-३-२००८ रोजी दिलेला असून इमारत वापरात आहे.

**सचिवांची साक्ष :--**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., सांगली यांनी दिलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या अनुषंगाने दिनांक २६ जून, २००९ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीस सचिव, सार्वजनिक आरोग्य यांनी असे सांगितले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सुरुवातीला ज्या कामासाठी प्रशासकीय मान्यता (ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲप्रुव्हल) देण्यात आले होते त्यामध्ये विद्युती करणाच्या कामाचा समावेश नव्हता व मूळातच हे काम पूर्ण होण्यास उशीर झालेला असल्याचे त्यांनी मान्य करुन याबाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारीच जास्त माहिती देऊ शकतील असे समितीस सांगितले. त्यावर समितीने सचिव, सार्वजनिक आरोग्य यांच्या निदर्शनास आणून दिले की, समितीने दोन वर्षापूर्वी सांगली जिल्हापरिषदेला भेट दिली होती. त्यावेळी तेथील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रस्तुत मुद्यांच्या संदर्भात जी माहिती समितीला दिली होती ती माहिती समितीला पटलेली नसल्याने व एकंदरीतच समितीचे त्यामुळे समाधान होऊ न

शकल्यामुळे सदर मुद्यासंबंधातील वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी संबंधित विभागांच्या सचिवांची साक्ष घेण्यात येत आहे. त्यावेळी सचिव, सार्वजनिक आरोग्य यांनी समितीस असे सांगितले की, सदर काम जरी सार्वजनिक आरोग्य विभागाचे असले तरी बांधकाम करण्याचे व त्याला मंजूरी देण्याचे अधिकार तसेच बांधकामासंबंधातील इतर अनुषंगिक बाबींचा संबंध जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागांचाच असल्याने समितीने विचारणा केलेल्या सर्व बाबींची माहिती व प्रश्नांची उत्तरे त्यांनीच दिली पाहिजेत. यानंतर समितीने सचिव, सार्वजनिक आरोग्य यांच्या असे निदर्शनास आणून दिले की, सार्वजनिक आरोग्य विभागाकडून ज्या विभागाला बांधकाम किंवा अन्य कोणत्याही कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो त्यावेळी त्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे होत आहे किंवा नाही हे पाहण्याची सार्वजनिक आरोग्य विभागाची जबाबदारी नाही काय सदर प्रकरणी निधीचा योग्य प्रकारे विनियोग झालेला नसल्याचे समितीचे मत असल्यानेच हा मुद्दा सचिवांच्या साक्षीच्या वेळी उपस्थित करण्यात आला आहे.

समितीने पुढे सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडे अशी विचारणा केली की, एन.आर.एच.एम.च्या अधिकाऱ्यांमार्फत या कामांची तपासणी करुन हे काम लवकरात लवकर पूर्ण कसे होईल हे पाहणे आवश्यक होते असे आपणांस वाटत नाही काय याबाबतीत सचिव, आरोग्य विभाग यांनी असे सांगितले की, सन २००७ पासून एन.आर.एच.एम.चे काम सुरू करण्यात आले होते. त्याअगोदर हे मिशन नव्हते. त्याचबरोबर गेल्या वर्षी बांधकामासाठी जास्त प्रमाणात तरतूद करण्यात आली होती. एन.आर.एच.एम.च्या पूर्वी डिपीडिसीच्या मार्फत सदर काम केले जात होते. समितीने सचिव, सा. आरोग्य विभाग यांच्या सदर माहितीवर अशी विचारणा केली की, आपल्या विभागाच्या मार्फत तपासणी करुन बांधकाम करावे असे आपल्याला का वाटले नाही ? आपण आपल्या जबाबदारीतून मुक्त का होत आहात ? समितीच्या सदर विचारणेस सचिव, सा.आ.विभाग यांनी असे उत्तर दिले की, पूर्वी एन.आर.एच.एम.चे पैसे येत नव्हते. बांधकाम विभागाची यंत्रणा हे काम करीत होती. हे काम जुने असल्यामुळे त्या कामाला हात लावण्यात आला नाही. एन.आर.एच.एम. मार्फत ही कामे करण्यात हातभार लावला जातो. समितीने पुढे असे मत व्यक्त केले की,हा प्रश्न निकाली काढण्याच्या दृष्टीने आपण सचिव म्हणून प्रयत्न करणे आवश्यक आहे. ऑडिट पॅरा काढून इतकी वर्ष होऊन गेलेली आहेत. त्यानंतर समितीने जिल्हा परिषदेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष सुध्दा नोंदविली होती. तेव्हा आपण आपल्या विभागामार्फत चौकशी करुन येथे आला असतात तर आपल्याला अधिक चांगल्याप्रकारे उत्तरे देता आले असते, त्यावर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, सरसकट सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्राची वा उपकेंद्राची बांधकामे त्यांच्याकडून केली जात नाहीत. मात्र आपण म्हणता त्याप्रमाणे याकामाची तपासणी करुन घेण्यात येईल. समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुळ अंदाजपत्रकामध्ये विद्युतीकरणाच्या कामाचा समावेश केला होता काय ? त्यावर सचिव,

सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी असे सांगितले की, मुळ अंदाजपत्रकामध्ये विद्युत कामाचा समावेश केला गेला नव्हता ही वस्तुस्थिती आहे. समितीने आणखी पुढे विचारणा केली की, सदर काम करणारा कंत्राटदार काही कामे अर्धवट सोडून पळून गेला असताना त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समितीस असे आश्वासित केले की, ज्या अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराच्या विरुध्द कारवाई केली नाही. त्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन समितीस अहवाल सादर करण्यात येईल. समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, जिल्हा भेटीच्या वेळी कंत्राटदारास काळ्या यादीमध्ये टाकण्या विषयी आश्वासन देण्यात आले होते, मात्र अद्यापही त्यासंदर्भात कोणतीही कारवाई करण्यात न येणे ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असल्याने याप्रकरणी तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असा खुलासा केला की, समितीच्या जिल्हा भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे त्यांनी समितीला वेळेवर अहवाल द्यावयास पाहिजे होता, परंतु तो दिला गेला नाही तेव्हा पुन्हा असा प्रकार घडता कामा नये अशी त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना ताकीद देत असल्याचे सांगून दहावर्षे होऊनसुध्दा साडेतीन लाख रुपयांचे काम जर पूर्ण होत नसेल तर ते योग्य नसल्याने त्याबाबत चौकशी करुन या प्रकरणी जे कोणी अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर एक महिन्याच्या कालावधीत कारवाई करण्यात येईल व त्याबाबतची माहिती समितीला पाठविण्यात येईल असे समितीला अश्वासित केले.

समितीला दिनांक २६ जून, २००९ रोजीच्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी आश्वासित केल्यानुसार विभागाकडून दि. ११ फेब्रुवारी, २०१० रोजी समितीस सादर केलेल्या आश्वासित माहितीत खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे. संबंधित ठेकेदाराचे विरुध्द कारवाई म्हणून त्याचे नाव काळ्या यादीत टाकले आहे. तसेच तत्कालिन कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता यांनी केलेल्या कुचराईबाबत त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., सांगली यांच्या दिनांक १४-०७-२००९ रोजीच्या ज्ञापनान्वये सक्त ताकीद देण्याची कारवाई करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या विभागाकडून दिनांक ३-७-२००९ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

सांगली जिल्ह्यातील पंचायत समिती, आटपाडी अंतर्गत असलेल्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीच्या अपूर्ण कामाबाबत समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीवरुन असे निदर्शनास आले की, सदर उपकेंद्राच्या बांधकामासाठी रु.३,९५,४२८ एवढ्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता घेण्यात आली व त्यावर एकुण रु.३,३९,८२६ एवढा खर्च करण्यात आला. परंतु सदर उपकेंद्रातील रंगकाम, ड्रेनेज तसेच विद्युतीकरण इत्यादी कामे अपूर्ण अवस्थेत असल्याचे आढळून आले. **सदर इमारतीच्या कामास १० मार्च १९९६ रोजी सुरुवात करण्यात आली होती परंतु सन २००६**

पर्यंत देखील काम पूर्ण होवू शकले नाही. तसेच सदर काम करणारा कंत्राटदार काही कामे अर्धवट सोडून पळून गेला असताना त्यांच्याविरुध्द देखील कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. समितीने सचिवांच्या साक्षी दरम्यान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांना सदर प्रकरणाबाबतची माहिती विचारली असता त्यांनी सदर कामास उशीर झाला असल्याचे मान्य केले परंतु याबाबतची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी देवू शकतील असे सांगितले तसेच सदर काम जरी सार्वजनिक आरोग्य विभागाचे असले तरी बांधकाम करण्याचे व त्याला मंजुरी देण्याचे अधिकार तसेच बांधकामासंबंधातील इतर अनुषंगिक बाबींचा संबंध जि.प. च्या सार्वजनिक बांधकाम विभागाचा आहे असे सांगितले. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवाच्या अशा प्रकारच्या खुलाशावरुन समितीला आश्चर्य वाटले वास्तविक पाहता सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागाच्या सचिवांनी संपूर्ण माहितीसह समितीसमोर साक्षीसाठी उपस्थित राहणे आवश्यक असते तसेच समितीने विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे देखील त्यांनीच देणे अपेक्षित असते परंतु सदर प्रकरणी समितीने दोन वर्षापूर्वी जि.प सांगलीला भेट दिली होती व त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवरुन समितीचे समाधान होवू न शकल्याने सचिवांना साक्षीला बोलाविण्यात आले होते परंतु त्यांनी सदर बाबींचे समाधानकारक उत्तर दिले नाही. तसेच सदर बांधकामाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागावर ढकलून दिली यावरुन असे दिसून येते की, सार्वजनिक आरोग्य विभागाकडून ज्या विभागाला बांधकाम किंवा अन्य कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो व असा निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर सदर निधीचा विनियोग योग्य प्रकारे होत आहे किंवा नाही हे पाहण्याच्या जबाबदारी पासून सार्वजनिक आरोग्य विभाग अलिप्त राहत असल्याचे निदर्शनास आले यावरुन सदर प्रकरण सचिव पातळीवर किती गांभिर्याने घेतले जाते हे दिसून येते व एकंदरीत राज्याच्या एकूण सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नाकडे गांभिर्याने पाहिले जात नाही हेही सिध्द होते.

सदर उपकेंद्राचे कान जवळपास दहा वर्षाचा कालावधी पूर्ण होत आला तरी व्यवस्थीत होवू शकले नाही. तसेच सदर अपूर्ण कामास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी तसेच ठेकेदारांवर सचिवांची साक्ष झाल्यानंर कारवाई करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे. वास्तविक पाहता सदर कामास एवढा प्रदिर्घ कालावधी लागल्यामुळे सदर भागातील जनता आरोग्य सेवापासून वंचित राहिली तसेच सदर कामावरील खर्च ही वाढला यामुळे शासनाच्या ग्रामीण भागात आरोग्य सेवा पुरविण्याचा उदात्त हेतू सदर कालावधीत पूर्ण होवू शकला नाही ही बाब गंभीर असून संबंधितावर कडक कारवाई करणे आवश्यक आहे. सबब उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन संबंधीतावर तात्काळ योग्य ती कडक कारवाई करावी व त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

## १.२ भांडी खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

पंचायती राज समितीने दिनांक २३ ऑगस्ट, २००७ रोजी सांगली जिल्हा परिषदेच्या सन २००४-२००५ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालासंदर्भात सांगली जिल्हा परिषदेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, भांड्यांची खरेदी कोणी केली, जवळजवळ १० कोटी रुपयांची योजना होती, खरेदी कोणत्या दराने केली. त्यावर शिक्षणाधिकारी (माध्य) यांनी असे सांगितले की, गट शिक्षणाधिकारी स्तरावर भांडी घेतलेली आहेत. समितीने पुढे अशी ही विचारणा केली की. खरेदीचा विषय पंचायत समितीच्या सभागृहासमोर ठेवला होता काय? त्यावर शिक्षणाधिकारी यांनी असा खुलासा केला की, यासंदर्भातील दिनांक ६ मार्च, २००७ रोजीचा शासन निर्णय आहे. जिल्हा परिषदेने हा निधी तातडीने खर्च करावयाचा होता. कोणती भांडी खरेदी करावयाची होती, याचा आढावा घेऊन गट शिक्षणाधिकारी यांनी विहीत पध्दतीने खरेदी करावयाची होती, यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, किती ग्राम शिक्षण समित्यांचे ठराव आले होते ते गट विकास अधिकारी यांनी सांगावे. त्यावर शिक्षणाधिकारी यांनी असे सांगितले की, शिक्षण समितीच्या मागणीचा एकत्रित विचार करुन नंतर गट शिक्षणाधिकारी स्तरावरुन खरेदी झालेली आहे. गट विकास अधिकारी (वाळवा) यांनी असा खुलासा केला की प्रत्येक तालुक्याला ३१ मार्च पर्यंत भांडी खरेदीसाठी रक्कम पुरविण्याचे उद्दिष्ट होते. त्याप्रमाणे गट शिक्षणाधिकारी यांनी रक्कम वितरीत केलेली आहे. पंचायत समितीमध्ये या विषयावर किंवा ठरावावर चर्चा झालेली नाही. विषय सभागृहात ठेवला नव्हता.

एकूण किती रक्कम आली प्रत्येक तालुक्याला किती भांडी खरेदी केली याची माहीती शिक्षणाधिका-यांकडे असणे आवश्यक आहे. असे समितीने मत व्यक्त केले असता शिक्षणाधिकारी यांनी प्रत्येक तालुक्याला वेगवेगळी रक्कम दिली होती. अशी समितीला माहिती दिली. तसेच गट विकास अधिकारी (शिराळा) यांनी असा खुलासा केला की, यासंदर्भात ३१ तारखेला पैसे आले. पंचायत समितीमध्ये हा विषय उपस्थित झाला नाही. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, भांडी खरेदी योजनेमध्ये कोणत्याही प्रकारची विहित पध्दत अवलंबिलेली नाही. पंचायत समिती सभागृहासमोर विषय ठेवलेला नाही.पेमेंट कधी झाले, किती झाले याची गट विकास अधिकारी यांना माहिती नाही. एकूणच सर्व खरेदीचा व्यवहार संशयास्पद आहे. त्यावर शिक्षणाधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक ६ मार्च २००७ चा शासन निर्णय आहे. दिनांक २३-३-०७ रोजी पत्र आले. यासंदर्भात समितीने असे निदर्शनास आणून दिले की, तातडीची बैठक लावण्याची पंचायत समिती कायद्यात तरतूद आहे. पुढे समितीने असे मत प्रदर्शित कले की, परस्पर खरेदी करण्यात आली आहे. यामध्ये मोठा गैरव्यवहार झालेला आहे. बाजारातील दरानुसार एका ताटाची किंमत ४१ रुपये असताना ते १३१ रुपयांना खरेदी केले गेले. त्यावर गट विकास अधिकारी (शिराळा) यांनी समितीला असे सांगितले आहे की, पंचायत समिती सभापतीची मान्यता घेतलेली आहे.

**उपरोक्त माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागाकडून खालील मुदयांबाबतची माहिती मागविली.--**

**भांडी खरेदी** साठी प्रत्येक तालुक्यास किती रक्कम प्राप्त झाली एकूण भांडी खरेदी किती व कोणी केली ? भांडी खरेदीचा विषय पंचायत समितीमध्ये उपस्थित केला होता काय, नसल्यास सदर विषय पंचायत समिती समोर येण्याची कारणे काय आहेत ? सदर प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे.

**जिल्हा परिषद सांगली कडून उपरोक्त मुदयांच्या अनुषंगाने खालील माहिती प्राप्त झाली.--**

**शालेय पोषण** आहार योजनेअंतर्गत सन २००६-२००७ या शैक्षणिक वर्षात अन्न शिजवण्यासाठी स्टील भांडी खरेदी कामी मा.शिक्षण उपसंचालक (प्राथ) प्रा.शि.सं.म.रा.पुणे यांचेकडील पत्र क्रमांक शापोआ-२००६-०७-भां.ख.-प्रशिसं-३०१-१८३५५, दिनांक ९-३-२००७ (सदरचा आदेश या कार्यालयास दिनांक २२-३-२००७ रोजी प्राप्त झाले) अन्वये एकूण जिल्ह्यासाठी एकूण रक्कम रू.१२,१८,७५० अनुदान प्राप्त झालेले होते. सदर पत्रातील मार्गदर्शक सुचनानुसार प्रत्येक शाळेस स्टील भांडी खरेदी करणेसाठी खालील प्रमाणे प्रत्येक तालुक्यास या कार्यालयाकडील आदेश क्रमांक जा.क्र.-प्रशिवि-लेखा-२-वशी शापोआ-२००७, दिनांक २८-३-२००७ अन्वये अनुदान वितरीत करणेत आलेले होते.

**तालुकानिहाय भांडी खरेदी अनुदान वितरीत तक्ता**

| अ. क्र. | तालुका | भांडी खरेदी करण्यात आलेल्या शाळा संख्या | प्रति शाळा अनुदान | एकूण वितरीत करणे अनुदान |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | शिराळा | २७ | ४९९३/- | १३४८११/- |
| २ | वाळवा | २७ | ४९९३/- | १३४८११/- |
| ३ | मिरज | २७ | ४९९३/- | १३४८११/- |
| ४ | तासगाव | २७ | ४९९३/- | १३४८११/- |
| ५ | पलूस | २७ | ४९९३/- | १३४८११/- |
| ६ | क.महांकाळ | २७ | ४९९३/- | १३४८११/- |
| ७ | जत | २८ | ४९९३/- | १३९८०४/- |
| ८ | आटपाडी | २७ | ४९९३/- | १३४८११/- |
| ९ | खानापूर | २७ | ४९९३/- | १३४८११/- |
| | एकूण .. | २४४ | ४४,९३७ | १२,१८,२९२/- |

वरीलप्रमाणे अनुदान प्राप्त झालेनंतर पात्र निकषानुसार प्रत्येक शाळेत खालील प्रमाणे मा. शिक्षण संचालक यांचेकडील पत्र क्रमांक शापोयो-२००६-०७-भांख-प्रशिसं-३०१-१८३७१,

दिनांक १४/३/२००७ च्या पत्रासोबत पाठविण्यात आलेल्या उद्योग संचालनालय परिपत्रक क्रमांक उसं/भांखस/दर/निश्चिती/फेब्रिकेशन, कोठ्या, पेटी स्टील भांडी/५२/२००६-२००७/अे-३२४६३ दिनांक १९/१०/२००६ नुसार गिरिजामाता जनहित सेवाभावी संस्था एम.आय.डी.सी. वाळूज जि.औरंगाबाद या शासनमान्य संस्थेकडून गटशिक्षणाधिकारी मार्फत भांडी खरेदी करणेत आली आहे. सदर संस्थेस गटशिक्षणाधिकारी यांनी भांडी वाटप करणेचा आदेश दिलेला असून भांडी खरेदी केलेबाबतचे अनुदान गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत धनादेशाद्वारे अदा करणेत आलेले आहे.

| अ.क्र. | भांडी प्रकार | नग संख्या |
|---|---|---|
| (१) | धान्य कोटी | ३ |
| (२) | स्टील पिंप (पाण्याची टाकी) | २ |
| (३) | स्टील बादली | २ |
| (४) | स्टील भातवाडी | ५ |
| (५) | स्टील ग्लास | १० |
| (६) | चमचा (स्टील) | ६ |

वरील प्रमाणे प्रत्येक शाळेस भांडी खरेदी झालेली असून सदर भांडी खरेदीस मा.सभापती पंचायत समिती यांची मान्यता घेण्यात आलेली आहे. तथापि भांडी खरेदी साठी अनुदान हे दिनांक २२/०३/२००७ रोजी प्राप्त झालेले होते. त्यानंतर सदरचे प्राप्त अनुदान कोषागारातून काढणेस व संबधित गटशिक्षणाधिकारी यांना निकषानुसार अनुदान वाटप करणे इत्यादी साठी माहे मार्च अखेरपर्यंत कालावधी उलटून गेला असता व प्राप्त अनुदान अखर्चित राहिले असते. त्यामुळे तालुकानिहाय पंचायत समिती पुढे सदरचा विषय ठेवून मान्यता घेणेत आलेली नाही. सदरचा विषय पंचायत समिती सभागृहात मांडण्यास आवश्यक कालावधी नसल्यामुळे मान्यता घेणेत आलेली नाही. सदरची भांडी खरेदी ही शासन मान्य आर.सी.प्रमाणे शासनमान्य संस्थेकडून करणेत आलेली आहे. यास्तव सदर प्रकरणी कोणत्याही अधिकाऱ्यास जबाबदार धरुन कार्यवाही करणेचा प्रश्न उदभवत नाही.

**सचिवांची साक्ष -**

जिल्हा परिषदेकडून भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी सचिव, शिक्षण विभाग यांची दिनांक २६/६/२००९ रोजी समितीने साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, भांडीखरेदी करीत असताना ज्या पध्दतीचा अवलंब करावयास हवा होता तो केलेला नाही, तसेच भांडी खरेदी करण्यापूर्वी पंचायत समितीची मान्यता घेणे आवश्यक असतानाही ती घेण्यात आली नाही व भांडी परस्पररित्या खरेदी करण्यात आली होती काय. या संदर्भात सचिव, शिक्षण विभाग यांनी समितीला अशी माहिती दिली की, सदर भांडी खरेदीसाठी पंचायत समितीची मान्यता घ्यावी लागते मात्र या ठिकाणी पंचायत समितीच्या सभापतीची मान्यता घेऊन खरेदी करण्यात आली आहे. तसेच भांडी खरेदीसाठी सदर रक्कम मार्च, अखेरीस

उपलब्ध झाली किंवा कसे याबाबत संबंधितांची चौकशी करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येणार असल्याबाबत त्यांनी समितीस सांगितले सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन समितीने अशी विचारणा केली की, बाजारामध्ये एका ताटाची किंमत ४१ रुपये असताना ते १३१ रुपयांनी खरेदी केलेली आहेत काय. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे काहीही झालेले नसल्याबाबत तसेच सदर खरेदीमध्ये कोणताही भ्रष्टाचार झालेला नसल्याबाबत नमूद करुन शिक्षण संचालकांनी काढलेल्या पत्रानुसारच भांडी खरेदी करण्यात आली असल्याचे सांगितले तथापि, सचिव, शिक्षण विभाग यांनी याप्रकरणाची शासकीय स्तरावरुन सखोल तपासणी झालेली नसल्याने तशी तपासणी करण्यासाठी त्यांना एक महिन्याची मुदत देण्याबाबत समितीस विनंती केली. सदर एक महिन्याच्या कालावधीमध्ये सचिव शिक्षण विभाग या प्रकरणी चौकशी करुन त्यामध्ये जे कोणी जबाबदार आढळून येतील त्यांच्याविरुध्द केलेल्या कारवाईची माहिती समितीला देणार असल्याबाबत त्यांनी समितीस आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी**

सांगली जिल्हा परिषदेंतर्गत पंचायत समित्यांसाठी भांड्याच्या खरेदीची योजना कार्यान्वीत करण्यात आली होती व त्यानुषंगाने प्रत्येक तालुक्याला ३१ मार्च पर्यंत निधी उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यानुसार पंचायत समितीस्तरावर जि.प. मार्फत दिनांक २२.३.२००७ रोजी अनुदान प्राप्त झाले. खरेदी संदर्भातील प्रक्रिया पूर्ण करण्यास मार्च अखेरचा कालावधी उलटून गेला असता त्यामुळे पंचायत समितीची परवानगी न घेताच भांडी खरेदी करण्यात आली. भांडी खरेदीचा प्रस्ताव पंचायत समितीच्या सभागृहासमोर ठेवणे आवश्यक होते. परंतु तसे न करता भांडे खरेदीस नंतर कार्योत्तर मंजूरी घेण्यात आली. त्यामुळे सदर प्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसून येते.

सचिवांची साक्षी दरम्यान भांडी खरेदीसाठीचे अनुदान प्रत्यक्षात पंचायत समिती स्तरावर केव्हा प्राप्त झाले याबाबतची निश्चित माहिती समितीला प्राप्त होवू न शकल्याने याबाबतच्या माहितीची खात्री करुन घेवून त्यानुसार संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्याचे सचिवांनी आश्वासीत केले होते. तसेच शासन निर्णय दि. १९ ऑक्टोबर, २००६ चे अवलोकन केले असता असे दिसून आले की सदर भांडी खरेदी ही भांडार खरेदी समितीने निश्चित केलेल्या दरानुसार करण्यात आली आहे. परंतु **बाजार भावानुसार एका ताटाची किंमत ४१ रुपये असताना ते १३१ रुपयांना खरेदी केले आहे. या संदर्भात देखील शासन स्तरावर सखोल तपासणी करण्यात येवून सदर प्रकरणी जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल व त्याबाबतची माहिती समितीला एका महिन्याच्या आत पाठविण्यात येईल असे आश्वासीत करण्यात आले होते. परंतु अद्याप पर्यंत दोन्ही मुद्याबाबतची आश्वासीत माहिती समितीला प्राप्त होवू शकली नाही. यावरुन असे दिसून येते की, समितीला साक्षी दरम्यान दिलेल्या आश्वासनाचे अद्यापपर्यंत विभागाकडून पालन करण्यात आलेले नाही. एकूणच हा सर्व खरेदीचा व्यवहार संशयास्पद झाल्याचे दिसून येते.**

**सबब, सदर प्रकरणी शासन स्तरावर सखोल चौकशी करुन दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

# प्रकरण दोन

# ठाणे जिल्हा परिषद

## २.१ पंचायत समिती शहापूर अंतर्गत असलेली गैरव्यवहाराची प्रकरणे :-

**समितीने** दिनांक २४ ऑक्टोबर, २००७ रोजी ठाणे जिल्हा परिषदेअंतर्गत **शहापूर पंचायत समितीस भेट दिली.** प्रश्नावली क्रमांक २ च्या संदर्भात शहापूर पंचायत **समितीच्या गट विकास अधिकारी यांचेकडून खालील प्रश्नासंदर्भात** लेखी **स्वरुपात** माहिती **मागविण्यात आली होती.**

(अ) पंचायत समितीमध्ये सन २००४-०५ मध्ये गैरव्यवहाराची किती प्रकरणे उघडकीस आली, प्रकरणनिहाय गैरव्यवहाराचे स्वरुप काय आहे व त्यात गुंतलेली रक्कम तसेच अधिकारी/ कर्मचारी किती आहेत व त्यापैकी किती प्रकरणे निकालात काढण्यात आली,

(ब) प्रलंबित प्रकरणांपैकी किती प्रकरणाची चौकशी झाली आहे व किती प्रकरणे जिल्हा परिषदेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली,

(क) सन २००४-०५ पूर्वी उघडकीस आलेली, परंतु अद्याप निकालात न निघालेली प्रकरणे किती व ती प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(ड) वरील क मध्ये विचारलेल्या प्रकरणांपैकी जुन्यात जुनी प्रकरणे केव्हापासूनची आहेत?

**वरील प्रश्नांच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने पुढीलप्रमाणे लेखी खुलासा केला.**

सन २००४-०५ मध्ये पंचायत समिती शहापूरमध्ये ग्रामपंचायत फंडाची ९ व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेची १२ अशी एकूण २१ गैरव्यवहाराची प्रकरणे उघडकीस आली.

वसुलपात्र रक्कम रुपये १६,७३,१८८/- इतकी असून त्यास जबाबदार असणाऱ्या ग्रामसेवक / सरपंच यांची संख्या २२ इतकी आहे.

प्रलंबित प्रकरणांपैकी २१ प्रकरणांची चौकशी सुरु असून सर्व प्रकरणे प्राथमिक चौकशी करुन जिल्हा परिषद ठाणे कार्यालयाकडे पाठविली आहेत.

सन २००४-०५ पूर्वी १५८ प्रकरणे उघडकीस आलेली आहेत. तसेच वरील प्रकरणांमधून ६ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. ७ प्रकरणांची पूर्तता करुन अंतीम करण्याकरिता जिल्हा परिषदेकडे सादर केली आहेत. १५८ प्रकरणांची वसुली संबंधित ग्रामसेवकांच्या वेतनातून व सेवानिवृत्त ग्रामसेवकांच्या उपदानातून करण्याची कार्यवाही सुरु आहे.

जुन्यात जुनी प्रकरणे सन १९६४-७० पासूनची आहेत. ठाणे जिल्हा परिषदेकडून शहापूर पंचायत समितीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने शहापूर गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, गैरव्यवहारात गुंतलेली १६,७३,१८८/- रुपयांची वसुली झाली आहे काय, त्यावर गट विकास अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरहू रक्कम अद्यापपर्यंत वसूल झालेली नाही. समितीने पुढे अशी विचारणा केली की, २१ गैरव्यवहाराच्या प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे? त्यावर गट विकास अधिकारी यांनी असा खुलासा केला की, या गैरव्यवहारात गुंतलेल्या १७,२९,७१९/- रु. रक्कमेपैकी एकूण रक्कम रु.६,२९,५६०/- ची पूर्तता करुन, जि.प. कडे पाठविले आहेत. सदर प्रकरणी समितीने असा मुद्दा उपस्थित केला की, सुधारित उत्तरामध्ये नमूद केले आहे की, गैरव्यवहारातील १७,२९,७१९/- रक्कमेपैकी ६,२९,५६०/- रु. ची पूर्तता करुन जिल्हा परिषदेकडे पाठविले आहेत. या गैरव्यवहारामध्ये गुंतलेले ११ ग्रामसेवक व ७ सरपंचांवर काय कारवाई केली, तसेच ग्रामपंचायत फंडाच्या गैरव्यवहाराच्या प्रकरणात १० कर्मचारी गुंतलेले आहेत. याबाबतची सद्य:स्थिती काय आहे त्यावर गट विकास अधिकारी यांनी असा खुलासा केला की, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना व ग्रामपंचायत फंडामध्ये ८७,४७,०००/- रु.चा गैरव्यवहार झालेला असून, त्यापैकी ११,२५,२८६/- रुपये वसुली करण्यात आलेली आहे. या गैरव्यवहारांमध्ये एकूण ७८ कर्मचारी गुंतलेले आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या ग्रामसेवकांवर काय कारवाई केली ? त्याबाबत समितीला असे सांगण्यात आले की, त्यांना नोटीस देऊन, त्यांच्या वेतनातून वसुली केली आहे. सदर प्रकरणी ज्यांना निलंबित केले आहे त्यांच्याकडून वसुली केली आहे काय? अशी विचारणा केली असता त्यांच्या पगारातून दरमहा वसुली सुरु आहे असे गट विकास अधिकारी यांनी समितीला सांगितले.

गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द सूचना देऊनही आपण पुढे कोणतीही कारवाई केली नाही. सूचना दिल्यानंतर खुलासा मागविण्यासाठी किती दिवसांची मुदत दिली जाते असे समितीने विचारले त्यावर गट विकास अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, सूचना दिल्यानंतर ८ दिवसांत खुलासा मागविला जातो. सदर प्रकरणी सरपंचावर काय

कारवाई केली अशी विचारणा केली, त्यावर विस्तार अधिकारी (ग्राप.) यांनी असे सांगितले की, या दोन्हीही गैरव्यवहारांमध्ये ८ सरपंचांनी अनियमितता केलेली आहे. मुल्यांकनापेक्षा त्यांनी जादा खर्च केलेला आहे. याकामी ५० टक्के ग्रामसेवक आणि ५० टक्के सरपंच जबाबदार आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, सन २००४-०५ पूर्वी उघडकीस आलेली, निकालात न निघालेली किती प्रकरणे आहेत त्यावर गट विकास अधिकारी यांनी असा खुलासा केला की, सन २००४-०५ मध्ये १५८ प्रकरणे उघडकीस आली होती. उक्त प्रकरणांची वसुली संबंधित ग्रामसेवकांच्या वेतनातून व सेवानिवृत्त ग्रामसेवकांच्या उपदानातून सुरु आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, गैरव्यवहाराच्या २१ प्रकरणांमधून किती प्रकरणे निकाली काढली आहेत, त्याबाबत गट विकास अधिकारी यांनी असे सांगितले की, ६ प्रकरणे निकाली काढली असून, ७ प्रकरणांची पूर्तता करुन, अंतीम करण्याकरिता जि.प.कडे सादर केली आहेत. उर्वरीत ८ प्रकरणी सरपंचाकडे गुंतलेल्या गैरव्यवहाराच्या रक्कमेची माहिती प्राप्त झालेली नाही.

**उपरोक्त माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागांकडून खालील मुद्याबाबतची माहिती मागविली.**

पंचायत समिती शहापूर अंतर्गत असलेली गैरव्यवहाराची प्रकरणे-

१. गैरव्यवहारात एकूण बाबनिहाय किती रक्कम गुंतलेली आहे.

२. गैरव्यवहारात गुंतलेल्या रक्कमेची वसूली झाली आहे काय ? नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

३. गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर काय कारवाई करण्यात आली आहे ?

**जिल्हा परिषद ठाणे यांच्या कडून उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खालील माहिती प्राप्त झाली.**

१. पंचायत समिती शहापूर अंतर्गत गैरव्यवहार व संशयीत अपहारामध्ये बाबनिहाय खालीलप्रमाणे रक्कम गुंतलेली आहे.

| बाब | रक्कम |
|---|---|
| १. ग्रामनिधी | ८,५२,३१८/- |
| २. जरोयो/सग्रारोयो | ८,७६,९६७/- |
| एकूण .. | १७,२९,२८५/- |

२. होय.

३.ग्रामनिधीतील रु. ७,७६,२२८/- रक्कम वसुल झाली आहे. ज.रो.यो./स.ग्रा.रो.यो.मधून रक्कम रु. ६,८०,३८४/- वसुल झाली आहे अशी एकूण १४,५६,६१२/- रक्कम वसुल झाली आहे व रु.२,७२,६७३/- रक्कम शिल्लक आहे.

४. ग्रामनिधीच्या ९ प्रकरणापैकी ५ प्रकरणे निकाली निपाली आहेत जरोयोच्या १२ प्रकरणांपैकी ९ प्रकरणे निकाली निघाली आहेत.

उर्वरित ७ प्रकरणांमध्ये ३ सरपंचाकडून आर.आर.सी.प्रमाणे वसुलीची कारवाई करणेत येत आहे. २ ग्रामसेवक निलंबीत केले आहेत त्यांच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

**सचिवांची साक्ष :**

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने दिनांक १२ मे, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीदरम्यान समितीने गैरव्यवहारात बाबनिहाय एकूण किती रक्कम गुंतली आहे अशी विचारणा केली त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, गैरव्यवहार व संशयित अपहार यामध्ये ग्रामनिधिची ८, ५२, ३१८ व जरोयो/सग्रारोयो ची रु. ८,७६,९६७ अशी एकूण रु.१७,२९,२८५ एवढी रक्कम गुंतली आहे. त्यापैकी रु.१४,५६,६१२ एवढी रक्कम वसूल झाली आहे रु. २,७२,६७३ एवढी रक्कम शिल्लक आहे. ग्रामनिधीच्या ९ प्रकरणापैकी ५ प्रकरणे निकाली निघाली आहेत. जरोयोच्या १२ प्रकरणांपैकी ९ प्रकरणे निकाली निघाली आहेत व ७ प्रकरणे शिल्लक आहेत. ग्रामनिधीच्या प्रकरणांमध्ये ४ ग्रामपंचायती आहेत व त्यात ४ ग्रामसेवकांचा समावेश असून त्यांच्याकडून रक्कम रु. ७६,०९० वसुल करावयाची आहे, जरोयो मध्ये ३ ग्रामपंचायती आहेत व त्यामध्ये २ ग्रामसेवक व ३ सरपंचाचा समावेश असून त्यांच्याकडून रक्कम रुपये १,४०,७२८ वसुल करावयाचे आहेत एकूण रु.२,७२,६७३ वसूल करावयाचे आहेत. त्यावर समितीने पुढे सदर गैरव्यवहारातील ४ ग्रामसेवकांची प्रकरणे कोणत्या स्वरुपाची आहेत याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. ठाणे यांनी असा खुलासा केला की, ग्रामनिधीच्या अंतर्गत करण्यात येणाऱ्या अंगणवाड्या, रस्ते इत्यादी बांधकामाच्या आहेत. ४ ग्रामसेवकांपैकी २ ग्रामसेवक सेवानिवृत्त झाले आहेत व २ मयत झाले आहेत. श्री. बी. आर. पाटोळे हे ग्रामसेवक सेवानिवृत्त आहेत. त्यांच्याकडून रु. १५,२१० वसूल करावयाचे आहेत. श्री. व्ही. जी.शेरावते यांच्याकडून रु.३४,८७१ वसूल करावयाचे आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुल्यांकनाचा दाखला कोणाकडून घेतला जातो, त्यावर असे सांगण्यात आले की, प्रत्येक जिल्ह्याला मुल्यांकनासाठी डेप्युटी अकाऊंटंट, जे.ई. पद होते. परंतु सन १९८५ मध्ये सदर पदे कमी झाल्यामुळे मुल्यांकनाची अडचण निर्माण झाली त्यामुळे उपलब्ध असलेल्या जे.ई. कडूनच काम करुन घेतले जाते. त्यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, न्यायप्रविष्ठ प्रकरणे व ज्या प्रकरणामध्ये वेतनवाढी थांबविण्यात आलेल्या आहेत याबाबतची माहिती देण्यात यावी. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे, यांनी असे सांगितले की, १६ प्रकरणात एकूण ११ ग्रामसेवकांना निलंबित करण्यात आले असून त्यामध्ये गुंतलेली रक्कम रु. ३ लाख ४६ हजार ७१० रुपये आहे. त्यापैकी ३ लाख ३६ हजार १८ रुपये वसूल करण्यात आले असून १० हजार ६९२ रुपये वसूल व्हावयाचे आहेत. दोन ग्रामसेवकांकडून ही रक्कम वसूल करावयाची आहे. दुसरा मुद्दा न्यायालयीन केसेसच्या संदर्भातील असून एकूण न्यायालयातील प्रकरणांची संख्या १५ आहे. त्यामध्ये १३ ग्रामसेवक गुंतलेले आहेत. ६ प्रकरणात ग्रामसेवकांना

दोषमुक्त केलेले आहे. ८ प्रकरणे कोर्टात प्रलंबित आहेत. एका प्रकरणी ग्रामसेवक मयत झालेला आहे. न्यायालयीन प्रकरणामध्ये एकूण ६६ हजार ७२९ रुपये गुंतले आहेत. तिसरा मुद्दा फौजदारी गुन्ह्यासंबंधीचा असून एकूण २२ प्रकरणी फौजदारी गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. त्यात एकूण १६ ग्रामसेवक व ३ सरपंच गुंतलेले असून त्यात एकूण १ लाख ७९ हजार ३०१ रुपये गुंतलेले आहेत. त्यापैकी ३९ हजार ४१० रुपये वसूल करण्यात आलेले आहेत आणि १ लाख ३९ हजार ८९१ रुपये वसूल करावयाचे आहेत. तसेच सरपंच तिलोंडा ग्रामपंचायतीचे श्री.चौधरी यांच्याकडून ३४ हजार ८९५ रुपये, सरपंच श्री. सांबर यांच्याकडून ५६३ रुपये, सरपंच श्री.तिवारी, बोईसर ग्रामपंचायत यांच्याकडून ५३ हजार ७७१ रुपये, श्री. संख्ये यांच्याकडून ५० हजार ६६० रुपये वसूल करावयाचे आहेत. विभागीय चौकशीची एकूण चार प्रकरणे आहेत. त्यामध्ये २ कर्मचारी गुंतलेले आहेत व तीन प्रकरणात वसुली पूर्ण झालेली आहे. सरवली ग्रामपंचायतीचे एक प्रकरण असून २४ हजार ४४५ रुपये गुंतलेले आहेत त्याचा मृत्यू झाला असल्याने सदर रक्कम राईट ऑफ करावी लागेल. त्याच बरोबर वेतन रोखण्याच्या १७ प्रकरणात १४ ग्रामसेवकांकडे एकूण १ लाख ७८ हजार २३७ रुपये गुंतले असून १ लाख ७३ हजार रुपये वसूल झालेले आहेत. ५ हजार २२३ रुपये वसूल करावयाचे आहेत.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीवरुन असे निदर्शनास आले की, शहापूर पंचायत समिती अंतर्गत संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना/जवाहर रोजगार योजना व ग्रामपंचायत निधीची सन २००४-२००५ मधील एकूण २१ प्रकरणे असून त्यात रुपये १७,२९,२८५ एवढी रक्कम गुंतलेली असून अद्यापपर्यंत रुपये १४,५६,६१२ एवढी रक्कम वसुल झालेली असून उर्वरीत रक्कम रुपये २,७२,६७३ शिल्लक आहे. तसेच सन २००४-०५ पूर्वीची एकूण १५८ प्रकरणे असून त्यात एकूण रुपये ८७,४७,००० एवढया रक्कमेचा गैरव्यवहार झाला असून त्यापैकी एकूण रुपये ११,२५,२८६ एवढया रक्कमेची वसुली झालेली आहे.

**समितीने जि.प. ठाणे ला भेट देवून जवळपास ३ वर्षाचा कालावधी होवून गेला आहे परंतु अपहाराच्या प्रकरणात गुंतलेल्या संपूर्ण रक्कमेची वसुली तसेच संबंधीत दोषी व्यक्ती विरुध्द अद्यापपर्यंत कारवाई झालेली नाही. सन २००४-०५ या वर्षातील व त्यापूर्वीची गैरव्यवहार व संशयित अपहाराच्या प्रकरणांपैकी काही प्रकरणांची चौकशी झाली असल्याचे सचिवांच्या साक्षी दरम्यान निदर्शनास आले. परंतु एवढया संथगतीने कारवाईचे काम होत राहिले तर अशा प्रकारची कामे करणाऱ्यांच्या मनात प्रशासनाबद्दल जरब राहणार नाही व भविष्यात अशा प्रकारात वाढ होण्याची शक्यता आहे. सबब सदर गैरव्यवहार व संशयीत अपहाराच्या प्रकरणाचा आढावा घेवून कालमर्यादेत त्यांचा निपटारा करुन दोषी आढळून येणाऱ्या संबंधितावर योग्य ती कारवाई करावी व करण्यात आलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी. अशी शिफारस समिती करीत आहे.**

## २.२ ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या अपूर्ण योजनाबाबत

**पंचायती** राज समितीने ठाणे जिल्हा परिषदेच्या सन २००४-०५ च्या वार्षिक प्रशासन अहवाला **संदर्भातील** प्रश्नावली क्रमांक १ मधील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनेसंदर्भातील खालील **मुददयांवर** माहिती विचारली.

**(१) जिल्हा परिषदेअंतर्गत मार्च, २००६ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पंचायत समिती निहाय किती नळपाणी पुरवठा योजनांची कामे हाती घेण्यात आली होती. त्यापैकी प्रत्यक्षात किती योजना पूर्ण होऊन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे, किती पाणीपुरवठा योजना अपूर्ण आहेत व त्याची कारणे काय आहेत?**

**(२) " जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी " अंतर्गत मार्च २००६ अखेर जिल्हा परिषदेकडून किती रक्कम जमा होणे अपेक्षित होते व त्यापैकी प्रत्यक्षात किती रक्कम उक्त कालावधीत जमा झाली आहे?**

(३) अंदाजित जमा रक्कमेपेक्षा प्रत्यक्षात कमी रक्कम जमा झाली असल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

(४) "जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी " मधून सन २००४-२००५ या वर्षात किती पाणी पुरवठा योजनांची दुरुस्ती करण्यात आली व त्यावर एकूण किती खर्च झाला आहे?

(५) पाणी पुरवठयाचा उद्‌भव (सोर्स ) कमी होऊ नये यासाठी जिल्हा परिषदेने काय उपाययोजना केलेल्या आहेत?

(६) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तसेच ग्रामीण पाणीपुरवठा योजनेअंतर्गत गेल्या पाच वर्षात हाती घेतलेल्या व अद्यापी पूर्ण न झालेल्या योजनांच्या कामांची यादी पंचायत समितीनिहाय दयावी. या योजनांची कामे अपूर्ण असण्याची सर्वसाधारण कारणे नमूद करण्यात यावीत.

(७) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आलेल्या व काही कालावधीनंतर बंद पडलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांची पंचायत समितीनिहाय संख्या किती आहे, सदर योजना बंद पडण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, सदर योजनांची दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करण्यात आले वा करण्यात येत आहेत?

(८) नळ पाणी पुरवठा योजना नादुरुस्त असलेल्या गावातील लोकांच्या पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था कशा प्रकारे करण्यात आली आहे?

**सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी खालीलप्रमाणे लेखी खुलासा केला.**

(१) जिल्हा परिषदेअंतर्गत मार्च-२००६ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पंचायत समितीनिहाय हाती घेण्यात आलेल्या नळ पाणीपुरठा योजनांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | पंचायत समिती | हाती घेण्यात आलेल्या योजनांची संख्या | प्रत्यक्षात पूर्ण झालेल्या योजनांची संख्या | पाणीपुरवठा सुरु असलेल्या योजनांची संख्या | अपूर्ण योजनांची संख्या | योजना अपूर्ण रहाण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | अंबरनाथ | २ | २ | २ | .. | .. |
| २ | मुरबाड | ७ | ७ | ७ | .. | .. |
| ३ | शहापूर | २५ | २३ | २३ | २ | (१) वाशिंद येथील नळपाणी पुरवठा योजनेची लोकवर्गणी जमा न झाल्यामुळे योजना सुरु करता आली नाही. तथापि अंशत: लोकवर्गणी प्राप्त झाल्यामुळे दिनांक ९/११/२००६ रोजी कार्यादेश देवून काम सूरु केले आहे. (२) वाशाळे नळ पाणीपुरवठा योजनेचा उद्भव कोरडा गेल्याने योजना पूर्ण होऊ शकली नाही. |
| ४ | वाडा | ५ | ५ | ५ | .. | .. |
| ५ | जव्हार | २ | २ | २ | .. | .. |
| ६ | डहाणू | ३ | ३ | ३ | .. | .. |

तक्ता--चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | पालघर | ७ | ६ | ६ | १ | वाढीव पालघर व २६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना : कामाची व्याप्ती मोठी असल्यामुळे निविदा ३ भागात काढण्यात आल्या. २ भागांची कामे प्रगतीपथावर आहेत. पंपींग मशिनरीच्या कामाची निविदा प्रक्रीया सुरु आहे. |
| ८ | वसई | १ | १ | १ | .. | .. |
| ९ | भिवंडी | ३ | २ | २ | १ | पडघा पाणीपुरवठा योजनेचे काम लोकवर्गणी अभावी चालू करण्यात आलेले नाही. |
| १० | कल्याण | .. | .. | .. | .. | .. |
| ११ | मोखाडा | ३ | ३ | ३ | .. | .. |
| | एकूण .. | ५८ | ५४ | ५४ | ४ | |

(१) जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी अंतर्गत सन २००५-०६ मध्ये मार्च २००६ अखेर ठाणे जिल्हा परिषदेकडून रक्कम रु. ३३,२४,००० जमा होणे अपेक्षित होते. त्यापैकी प्रत्यक्षात मार्च २००६ अखेर पर्यंत रक्कम रु. ३३,२४,००० पूर्णपणे देखभाल दुरुस्ती खाती जमा करण्यात आलेली आहे.

(२) मार्च २००६ अखेर रक्कम १००% जमा झालेली आहे.

(३) सन २००४-०५ या वर्षात १४ योजनांची दुरुस्ती करण्यात आली. त्यावर रु. २४,३५,६९१ लक्ष खर्च झाला आहे.

(४) पाणी पुरवठयाचे उद्भव (सोर्स ) उन्हाळयात कमी पडू नये यासाठी उदभवाच्या नजिक माती बंधारे, सिमेंट बंधारे, वनराई बंधारे, विहिर खोल करणे गाळ काढणे इत्यादी जलसंधारणाची कामे घेण्यात आली आहेत.

(५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत गेल्या पाच वर्षात हाती घेतलेल्या परंतु पूर्ण न झालेल्या योजनांची एकूण संख्या ६३ असून सदर योजना अपूर्ण राहण्याची मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेत.--

(१) ठेकेदाराने काम अर्धवट सोडणे.

(२) जागेची अडचण.

(३) किरकोळ कामे.

(४) स्थानिक अडचण.

(५) विद्युत जोडणी बाकी.

(६) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण झालेल्या व काही कालावधीनंतर बंद पडलेली पंचायत समितीनिहाय एकही योजना नाही.

(८) नळपाणी पुरवठा सुरु असल्याने पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

जिल्हा परिषद ठाणे यांचेकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. ठाणे यांची दि. २५ ऑक्टोबर २००७ रोजी साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीने अशी विचारणा केली की, शहापूर पंचायत समितीअंतर्गत पाणी पुरवठयाच्या दोन योजना अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत. त्यावर कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) यांनी असा खुलासा केला की, वाशिंद येथील नळ पाणीपुरवठा योजनेची लोकवर्गणी जमा न झाल्यामुळे योजना सुरु करता आली नाही. तथापि अंशतः लोकवर्गणी प्राप्त झाल्यामुळे दिनांक ९.११.२००६ रोजी कार्यादेश देवून काम सुरु केले आहे तसेच वाशाळे नळ पाणीपुरवठा योजनेचा उद्‌भव कोरडा गेल्याने योजना पूर्ण होऊ शकली नाही. समितीने पुढे अशी विचारणा केली की, १० टक्के लोकवर्गणी गोळा होण्याच्या अगोदर पाणीपुरवठा योजनेच्या कामाला कशी काय सुरुवात करण्यात आली त्यावर कार्यकारी अभियंता (मा.जि.प्र.) यांनी समितीला अशी माहिती दिली की, वाशिंद येथील नळ पाणीपुरवठा योजनेकरिता शासनाने परवानगी दिलेली आहे. १० टक्के लोकवर्गणीपैकी ५० टक्के लोकवर्गणी भरल्यानंतर योजनेचे ५० टक्के काम सुरु करण्यात आलेले आहे. १० टक्के लोकवर्गणीपैकी ५० टक्के लोकवर्गणी मिळाल्यानंतर काम सुरु करण्याच्या संदर्भात शासनाला विनंती केली होती. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, काही गावांमध्ये पाणीपुरवठा योजनेसाठी लोक वर्गणीच देत नाही. लोकवर्गणीच्या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्रात हीच परिस्थिती आहे. ७० टक्के जनता लोकवर्गणी देते तर ३० टक्के जनता लोकवर्गणीच देत नाही. त्यामुळे पाणी पुरवठयाच्या योजना सुरु होत नाहीत. पाणी पुरवठयाच्या योजना राबविण्याकरिता लोकवर्गणीचे पैसे जास्तीत जास्त जमा होणे आवश्यक आहे.

"जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी" अंतर्गत मार्च, २००६ अखेर जिल्हापरिषदेकडून किती रक्कम जमा होणे अपेक्षित होते व त्यापैकी प्रत्यक्षात किती रक्कम उक्त कालावधीत जमा झाली अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता यांनी अशी माहिती दिली की, जिल्हा

देखभाल व दुरुस्ती निधी अंतर्गत सन २००५-०६ मध्ये मार्च, २००६ अखेर ठाणे जिल्हा परिषदेकडून रक्कम रु. ३३,२४,००० जमा होणे अपेक्षित होते. त्यापैकी प्रत्यक्षात मार्च २००६ अखेरपर्यंत रक्कम रु. ३३,२४,००० पूर्णपणे देखभाल दुरुस्ती खाती जमा करण्यात आलेली आहे. जिल्हा परिषदेच्या नियमित निधीतून हा खर्च करण्यात आलेला आहे. समितीने पुढे असे विचारले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तसेच ग्रामीण पाणीपुरवठा योजनेअंतर्गत ६३ योजना छोटया छोटया कारणामुळे अपूर्ण दाखविलेल्या आहेत, त्याची कारणे काय आहेत. याबाबत कार्यकारी अभियंता यांनी असा खुलासा केला की, ६३ अपूर्ण योजनांपैकी १६ कामे पूर्ण झाली असून ४७ योजनांची कामे अपूर्ण आहेत. उर्वरित अपूर्ण असलेली ४७ कामे मार्च पर्यंत पूर्ण करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल.

कल्याण पंचायत समितीने आणे ठाकूरपाडा नळ पाणीपुरवठा योजनेला दिनांक १०-६-१९९९ रोजी कार्यादेश दिले. योजनेची उध्दरण वाहिनी टाकण्यास पांजरपोळ ट्रस्ट यांनी प्रतिबंध केल्याने व कोर्टातून स्थगिती आदेश आल्याने पुढील काम करणे शक्य झाले नाही अशी माहिती दिलेली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी कोणीही आडकाठी आणू शकत नाही. असे असताना या कामासाठी कोर्टाने स्थगिती दिलेली आहे त्यामुळे स्थगिती उठविण्यासाठी आपण १९९९ पासून २००७ पर्यंत काय प्रयत्न केले आहेत. अशी समितीने विचारणा केली असता, उध्दरण वाहिनी पांजरपोळमधून जात होती त्यामुळे पांजरपोळ ट्रस्टने कोर्टाकडून स्थगिती आदेश मिळवलेले आहेत. असा खुलासा कार्यकारी अभियंता यांनी केला. कोर्टाने या कामाच्या संदर्भात स्थगिती आदेश केव्हा दिले होते. अशी समितीने विचारणा केली असता यासंदर्भात कोर्टाचे आदेश दिनांक ३ जानेवारी, २००१ रोजी आले होते. असे कार्यकारी अभियंता यांनी समितीला सांगितले. ही पाणी पुरवठयाची योजना आहे, ही बाब आपण कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली होती का, कोर्टाची स्थगिती उठविण्यासाठी आपण अपिल केले होते काय, अशी समितीने पुन्हा विचारणा केली त्यावर कार्यकारी अभियंता यांनी असे सांगितले की, यासंदर्भात वकीलाशी चर्चा केली होती. परंतु आता अपिल करता येणार नाही. त्याच वेळेस अपिल कराव्यास पाहिजे होते असे वकिलांनी मत व्यक्त केले होते. समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, पाणी पुरवठयाची योजना आहे ही बाब आपण कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली असती तर त्याचा उपयोग झाला असता. आता या ठिकाणी पाणीपुरवठा कशा प्रकारे केला जात आहे अशी समितीने विचारणा केली त्यावर असा खुलासा करण्यात आला की, पिण्याच्या पाण्याच्या दोन विहिरी तसेच विंधन विहिरीच्या माध्यमातून या भागाला पाणीपुरवठा केला जात आहे. ही योजना पूर्ण करण्यासाठी आता आपण काय प्रयत्न करणार आहात असे समितीने विचारले त्यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीला असे सांगितले की, पांजरपोळ ट्रस्टशी बोलणी करुन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

शहापूर पंचायत समितीअंतर्गत काजळविहीर नळपाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात काय स्थिती आहे अशी समितीने विचारणा केली असता या संदर्भात कार्यकारी अभियंता यांनी समितीला अशी माहिती दिली की, ठेकेदाराने या योजनेचे काम अर्धवट सोडल्याने ठेकेदारास काळया यादीत टाकण्यात आलेले असून १० टक्के लोकवर्गणीतून नवीन योजना सुरु केलेली आहे.

समितीने ठाणे जिल्हा परिषदेला दिनांक २५ ऑक्टोबर,२००७ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी असे निदेश दिले होते की, ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजना - १० टक्के लोकवर्गणी गोळा होण्याच्या अगोदर पाणीपुरवठा योजनेच्या कामाला कशी काय सुरुवात करण्यात आली या संदर्भात शासनास जो पत्र व्यवहार केलेला आहे तो समितीला दाखविण्यात यावा. त्या अनुषंगाने ठाणे जिल्हा परिषदेकडून माहिती प्राप्त झाली असून पुढीलप्रमाणे कार्यवाही केल्याचे कळविले आहे.

(१) मुख्य अभियंता (को.वि.) यांनी दिनांक २.७.२००५ च्या पत्र क्र.सी.आर.-८०/१७६८ द्वारे दोन टप्प्यात योजनेचे काम हाती घेण्यास विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांचेकडे परवानगी मागितली होती.

(२) शासन निर्णय क्र.ग्रापापु-११०२/प्र.क्र.२६४/पापु-०६, दिनांक १८.९.२००२ अन्वये वाशिंद नळ पाणीपुरवठा योजनेस प्रशासकीय मंजुरी योजनेचे काम दोन टप्प्यात करण्याच्या अटीच्या अधीन देण्यात आली आहे.

(३) ग्रा.पा.पु.११०५/मै.स.१०/सीआर-४६/पापु-०६, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांचे दिनांक २-९-२००५ द्वारे योजनेच्या निविदा मागविण्यास मंजुरी दिली आहे. तसेच कामाच्या प्रमाणात लोकवर्गणी प्राप्त झाली आहे याची खात्री करुन कामे घेण्याचे निर्देश दिले आहेत.

(४) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय यांचे दिनांक १५.२.२००८ च्या पत्रान्वये योजनेसाठी आवश्यक असलेली लोकवर्गणी ग्रामपंचायत फंडातून जमा करण्यास एक विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात आली आहे.

वरील माहितीच्या अनुषंगाने समितीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तसेच ग्रामीण पाणीपुरवठा योजनेमार्फत ६३ योजना छोटया छोटया कारणामुळे अपूर्ण दाखविण्यात आलेल्या आहेत. त्याची कारणे काय आहेत, या संदर्भातील अहवाल समितीला देण्यात यावा. असे निदेश दिले असता, जिल्हा परिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत हाती घेण्यात आलेली कामे प्रगतीपथावर आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत घेण्यात आलेल्या ६३ योजनांपैकी एकूण ३४ योजनांची कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित २९ योजनांची कामे प्रगथीपथावर आहेत. अशी कारवाई केल्याची माहिती सनितीला दिली.

**उपरोक्त माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागाकडून खालील मुद्दयाबाबतची माहिती मागविली.**

१. ठाणे जिल्ह्यात अपूर्णावस्थेत असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांची सद्य:स्थिती काय आहे ?

२. तसेच सदरहू नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाचे प्रमुख कारण कोणते आहे ?

३. प्रत्येक नागरिकांला पिण्यासाठी शुध्द पाणी पुरविण्याबाबतची प्राथमिक जबाबदारी ही शासनाची असते. त्यामुळे सदर कामे प्राथम्य क्रमाने करण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे व त्यानुसार पुढे याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडून उपरोक्त मुद्दयांच्या अनुषंगाने खालील माहिती प्राप्त झाली.**

ठाणे जिल्ह्यात एकूण ६३ कामे अपूर्ण अवस्थेत होती. यापैकी ४६ कामे पूर्ण झाली असून त्या गावांचा पाणीपुरवठा सुरु आहे. उर्वरीत १७ कामे अपूर्ण होती. त्या १७ कामांपैकी सद्य:स्थितीत ०५ योजनांतून पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. तसेच ०२ गावांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व पालघर नगरपरिषदेमार्फत पाणीपुरवठा सुरु करणेत आलेला आहे. या १७ योजनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेल्या ०७ योजनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.--

(१) आधनवाडी (२) लोवरे (३) कुंज (४) वरले (५) कलोली-बोरीचापाडा (६) दहिसर तर्फे तारापूर (७) खानदेश--

प्रगतीपथवार असलेल्या ०२ योजना.--

(१) काजळविहीर न.पा.पु.यो (२) उंबरमाळी न.पा.पु.यो.

या दोन्ही ठिकाणी जून २०१० अखेर पाणीपुरवठा सुरु करण्याचे नियोजित आहे. गावातील अंतर्गत वादामुळे बंद असलेली योजना.

(१) करचोंडे-बोरवाडी न.पा.पु.यो.

न्यायप्रविष्ट असल्यामुळे बंद असलेल्या ०३ योजना.--

(१) आणे-ठाकुरपाडा, (२) देहरजे न.पा.पु.यो., (३) केव न.पा.पु.यो.

फौजदारी गुन्हा दाखल केलेली ०१ योजना.--

(१) साखरे न.पा.यु.यो.-

ठेकेदारास काळ्या यादीत टाकून सुधारीत अंदाजपत्रक मंजूर/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर कामे.०२.--

(१) गालतरे न.पा.पु.यो.,

(२) सायवण आश्रमशाळा न.पा.पु.यो

वीज जोडणी व किरकोळ कामाअभावी कार्यान्वित न झालेली योजना :-०१

(१) कामण आश्रमशाळा न.पा.पु.यो.

न.पा.पु.योजना पुर्ण होण्यास लागणाऱ्या विलंबाची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहे.--

(१) ठेकेदाराने काम अर्धवट सोडल्यामुळे, त्यांना काळ्या यादीत टाकून नव्याने ठेकेदार नेमून काम करुन घेणे.

(२) गावातील अंतर्गत वाद.

(३) प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे.

(४) विद्युत जोडणीचा जादाचा खर्च व वेळेवर विद्युत पुरवठा न होणे. तसेच गावातील विद्युत देयकाच्या थकबाकीमुळे.

प्रत्येक नागरिकाला पिण्यासाठी शुध्द पाणी पुरविण्याबाबतची प्राथमिक जबाबदारी शासनाची आहे. अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करुन पाणीपुरवठा सुरु करण्यासाठी परिणामकारक कार्यवाही करण्यांत येत आहे. दरमहा उप अभियंता व गट विकास अधिकारी यांच्या आढावा बैठका घेवून अपूर्ण कामे पुर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत लोकसहभाग व मागणी आधारीत पुरवठा तत्वावर गावाच्या मागणी नुसार व गावाच्या आवश्यकतेनुसार विविध पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आलेल्या आहेत. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत सन २००९-१० च्या कृती आराखड्यातील ७१९ गाव/पाड्यांना पाणीपुरवठा करण्याचे उद्दीष्ट साध्य केलेले आहे.

**सचिवांची साक्ष :**

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने दिनांक १२ मे, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. ठाणे, यांनी असा खुलासा केला की, त्यावेळी ६३ कामे अपूर्ण होती त्यापैकी ४६ कामे पूर्ण झालेली असून त्या गावांना पाणीपुरवठा सुरु झालेला आहे. १७ अपूर्ण कामांपैकी ५ योजनांतून पाणीपुरवठा सुरु केला आहे. म.जि.प्र. व पालघर नगरपालिकेतर्फे दोन गावांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दोन योजनांची कामे प्रगतीपथावर असून त्यातून जून, २०१० पर्यंत पाणीपुरवठा सुरु होईल. गावातील अंतर्गत वादामुळे १ योजना बंद आहे व तीन योजना न्यायप्रविष्ट असल्याने बंद आहेत. तसेच फौजदारी

गुन्हा दाखल असल्याने ठेकेदारास काळ्यायादीत टाकल्यामुळे तसेच वीज जोडणी व किरकोळ कामाअभावी अशा कारणामुळे एकूण ३ योजना बंद आहेत. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की याबाबतीत ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. तसेच सन २००४-२००५ सालापासून आतापर्यंत सदर योजनांच्या कामात किती प्रगती झाली त्यावर सचिवामार्फत असे सांगण्यात आले की, ५३ योजना पूर्ण झाल्या आहेत. उर्वरीत १० योजनांच्या बाबतीत आदेश देण्यात आलेले आहेत.

समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निर्णय लवकर लागण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच अपूर्ण काम केलेल्या ठेकेदाराला नुसते ब्लॅकलिस्ट करुन विषय संपत नाही तर त्यात गुंतलेल्या रक्कमेच्या वसुली संदर्भात पुढे काय कारवाई करणार आहात. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, या योजनेची अंदाजपत्रकीय किंमत ३ लाख ६३ हजार रुपये होती आणि २ लाख ८५ हजार रुपयाचे रनिंग बिल झालेले आहे. त्या कामाचे मूल्यमापन करण्यात येईल आणि जादा रक्कम दिली असेल तर इतर कामातून रक्कम वसूल करण्यात येईल.

**अभिप्राय व शिफारशी :**

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनेअंतर्गत ग्रामीण नळ पाणी पुरवठ्याच्या अनेक योजना, ह्या ठेकेदाराने अर्धवट काम सोडणे, न्यायालयीन प्रकरणे, जागेची अडचण, किरकोळ कामे अपूर्ण असणे, विद्युत जोडणी इत्यादी कारणामुळे अपूर्णावस्थेत असल्याचे उपरोक्त माहितीवरुन समितीच्या निदर्शनास आले. सचिवांच्या साक्षीच्या वेळी अपूर्ण असलेल्या एकूण ६३ पाणीपुरवठ्याच्या योजनेपैकी जवळपास ५३ योजना पूर्ण झाल्याची माहिती समितीसमोर आली. उर्वरीत १० योजनांची कामे लवकर पूर्ण करुन घेण्याबाबत संबंधितांना आदेशित करण्यात येते आहे असे लेखी माहितीत नमूद करण्यात आले होते. **परंतु सदर १० योजनांची कामे अपूर्ण असल्याचे साक्षीच्या वेळी उघड झाले, ज्यावेळी सदर अपूर्ण योजनांची कामे पूर्ण करुन त्यातून पाणीपुरवठा सुरळीत सुरु झाला आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. तसेच अपूर्ण कामापैकी काही कामे न्यायालयीन कारणांमुळे प्रलंबित आहेत अशा प्रकरणाचा निकाल लवकर लावून तेथील जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत अशी शिफारस समिती करीत आहे.**

**तसेच काही पाणीपुरवठ्याच्या योजनांची कामे ठेकेदारांनी अर्धवट सोडल्यामुळे अपूर्ण राहिली आहेत व त्यांत शासनाची रक्कम देखील गुंतून पडलेली आहे. अशा ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून त्यांच्या कामाचे मूल्यांकन करुन कामापेक्षा जास्त देण्यात आलेली रक्कम वसुल करण्यात यावी व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला पाठविण्यात यावी अशीही शिफारस समिती करीत आहे.**

# परिशिष्ट
## समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

## गुरुवार, दिनांक २३ ऑगस्ट, २००७
## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सांगली

**उपस्थिती**

१. श्री. राजन पाटील, वि.स.स तथा समिती प्रमुख

२. श्री. नाना पंचबुध्दे, वि.स.स.

३. श्री. दिलीप बनसोड, वि.स.स.

४. श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स.

५. श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर) , वि.स.स.

६. श्री. सुनील केदार, वि.स.स.

७. श्री. कैलास पाटील, वि.स.स.

८. श्री. संजय राठोड, वि.स.स.

९. श्री. कैलास पाटील, वि.स.स.

१०. श्री. संजय राठोड, वि.स.स.

११. श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१२. श्री. साहेबराव घोडे, वि.स.स.

१३. श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स.

१४. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

१५. श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. वि. वा. देशमुख, उपसचिव,

(२) श्री. आर. आर. काठे, समिती अधिकारी,

(३) श्री. श. बा. गायकवाड, कक्ष अधिकारी.

**मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी (लेखा) :**

(१) श्री. सी. जी. पवार, मुख्य लेखा परिक्षक.

**विभागीय प्रतिनीधी :**

(१) श्री. र. ना. अंबरित, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

(२) श्री. कृ. शे. कांबळे, अवर सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई.

**सांगली जिल्हा परिषदेचे अधिकारी :**

१. श्री. गोकुळ मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सांगली.
२. श्री. रविंद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सांगली.
३. श्री. रविंद्र शेळके, मुख्य लेखा वित्त अधिकारी, जि.प.सांगली.
४. श्री. प्रभाकर गावडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र), जि.प.सांगली.
५. श्री. संतोष जोशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जि.प.सांगली.
६. श्री. एम. आर. पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक), जि.प.सांगली.
७. श्री. ना. भि. पाटील, शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प.सांगली.
८. श्री. बी. पी. कांबळे, शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.सांगली.
९. श्री. डी. एस. जगताप, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण), जि.प.सांगली.
१०. श्री. रजनीकांत शिंदे, कार्यकारी अभियंता (बांधकाम), जि.प.सांगली.
११. श्री. के. बी. सुर्यवंशी, कार्यकारी अभियंता (लपा.), जि.प.सांगली.
१२. श्री. ए. एच. सुर्यवंशी, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.), जि.प.सांगली.
१३. श्री. एन. टी. शिसोदे, कृषी विकास अधिकारी, जि.प.सांगली.
१४. डॉ. एल. एस. साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सांगली.
१५. डॉ. एम. ए. पाचपिंडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.सांगली.
१६. श्री. ए. एस. माने, प्रकल्प संचालक, डीआरडीए, जि.प.सांगली.
१७. श्री. एच. बी. कांबळे, प्र.समाजकल्याण अधिकारी, जि.प.सांगली.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत सांगली जिल्हापरिषदेच्या सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या प्रश्नावली क्रमांक १ च्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, सांगली यांची साक्ष घेतली.

## गुरुवार, दिनांक २५ ऑक्टोबर, २००७
## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, ठाणे

**उपस्थिती**

१. श्री. राजन पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स.
३. श्री. माणिक जगताप, वि.स.स.
४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
५. श्री. सुभाष बने, वि.स.स.
६. श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.
७. श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.
८. श्री. कैलास पाटील, वि.स.स.
९. श्री. सदाशिव लोखंडे, वि.स.स.
१०. श्री. विश्वास नांदेकर, वि.स.स.
११. श्री. संजय राठोड, वि.स.स.
१२. प्रा. अतुल देशकर, वि.स.स.
१३. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
१४. श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. वि. वा. देशमुख, उपसचिव,
(२) श्री. आर. आर. काठे, समिती अधिकारी.

**मुख्य लेखा परिक्षक (स्थानिक निधी लेखा) त्यांचे कार्यालय :**

(१) श्री.डी.डी. द्वारके, मुख्य लेखा परीक्षक.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री.प्र.बा.हिर्लेकर, उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

ठाणे जिल्हा परिषदेचे अधिकारी :

१. श्री. सु. रा. हजारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, ठाणे,
२. श्री. एस. एन. तायडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण),
३. श्री. व्ही. आर. नाईक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),
४. श्री. योगेश महांगडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (जलस्वराज्य प्रकल्प),
५. श्री. सु. रा. शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
६. श्री. बी. एम. वराळे, प्रकल्प संचालक, ठाणे,
७. श्री. रविंद्र सावंत, मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
८. श्री. योगेश महांगडे, उप मु.का.अ., जलस्वराज्य,
९. डॉ. सुधाकर कोकणे, जिल्हा आरोग्य अधिकारी,
१०. श्री. सुभाष जाधव, का.अ., प्रधानमंत्री ग्राम सडक योजना,
११. श्री. आर. बी. शिरसाट, जि.स.क.अ.,
१२. श्री. सुभाष धावटे, कृषि विकास अधिकारी,
१३. डॉ. सु. चि. म्हस्के, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
१४. श्री. व्ही. एस..कान्हेरे, जि.कृ.अ.,
१५. श्री. एस. ए. पाटील. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
१६. श्री. बोरसे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
१७. श्री. एम. बी. वाघमारे, प्रभारी उप शिक्षणाधिकारी,
१८. श्री. संजय बाविस्कर, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा),
१९. श्री. प्र. भा. चव्हाण, कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे),
२०. श्री. व्ही. डब्ल्यु. भिवापूरकर, कार्यकारी अभियंता (बांधकाम),
२१. श्री. सुभाष जाधव, कार्यकारी अभियंता (पूर्व), प्रधानमंत्री ग्रामसडक योजना.

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने बैठकीत ठाणे जिल्हापरिषदेच्या सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या प्रश्नावली क्रमांक १ च्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, ठाणे यांची साक्ष घेतली.

## शुक्रवार, दिनांक २६ जून, २००९
## विधान भवन, मुंबई

**उपस्थिती**

१. श्री. सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

३. श्री. विष्णु सवरा, वि.स.स.

४. श्री. हेमंत पटले, वि.स.स.

५. श्री. विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

६. श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. म. सु. वाघमारे, समिती अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्रीमती शर्वरी गोखले, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,

(२) श्री.एन.अरुमुगम, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग,

(३) श्री. सुनील पोरवाल, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग,

(४) श्री.अजित कुमार जैन, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,

(५) श्री. संजय कुमार, सचिव, शालेय शिक्षण विभाग,

(६) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, सचिव, नगरविकास विभाग,

(७) श्री. बलदेव सिंह, सचिव, ग्रामविकास विभाग,

(८) श्री.एस.के.गोयल, सचिव, पशुसंवर्धन विभाग,

(१०) श्री. डी.एस.झगडे, आयुक्त,

(११) श्री. श्याम वर्धन, जिल्हाधिकारी, सांगली,

(१२) श्री. गोकुळ बबन मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे बैठकीच्या वेळी उपस्थित झालेल्या मुद्यांवर अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शालेय शिक्षण विभाग, सचिव, नगरविकास विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, पशुसंवर्धन विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली यांची साक्ष घेतली.

## मंगळवार, दिनांक ११ मे, २०१०
## विधान मंडळ, मुंबई

**उपस्थिती**

(१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
(३) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
(४) श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.
(५) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
(६) श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.
(७) श्री. विष्णु सावरा, वि.स.स.
(८) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१०) ॲड. उषा दराडे, वि.प.स.
(११) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव,

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, वित्त ( व्यय ),
(२) डॉ. पी.एम.मीना, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,
(३) श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
(४) श्री. मल्लीनाथ कलशेट्टी, उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
(५) श्री. प्रकाश हिर्लेकर, सह सचिव, गाम विकास विभाग व जलसंधारण विभाग,
(६) श्री. एकनाथ मोरे, उप सचिव, ग्राम विकास विभाग,
(७) श्री. गो.डो. तायडे, उप सचिव, रोजगार हमी योजना,
(८) श्री. सु.स. सनगर, उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

**जिल्हा परिषद, ठाणे :**

(१) श्री. एच. के. जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी,

(२) रवीद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

(३) श्री. म.स. साळुंखे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, वित्त ( व्यय ), प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, उप सचिव, रोजगार हमी योजना, उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.ठाणे यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक १२ मे, २०१०
## स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
३. श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
४. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
५. डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.
६. श्री. सुरेश खाडे, वि.स.स.
७. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
८. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.
९. श्री. अनिल राठोड, वि.स.स.
१०. श्री. दादाजी भुसे, वि.स.स.
११. प्रा. सुरेश नवले, वि.प.स.
१२. ॲड. उषा दराडे, वि.प.स.
१३. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**
श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.

**मुख्य लेखापरिक्षक स्थानिक निधी (लेखा ) :**
श्री. शं. धे. चव्हाण, सहमुलेप, स्थानिक निधी, लेखा,

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्रीमती शर्वरी गोखले, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
(२) श्री. संजयकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग,
(३) श्री. सुनील पोरवाल, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग,
(४) श्री. पी.एस.मीना, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग.

(५) श्रीमती मालिनी वि. शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,

(६) श्री. नानासाहेब पाटील, प्रधान सचिव, कृषी विभाग,

(७) श्रीमती वंदना कृष्णा, सचिव, महिला व बालविकास विभाग,

(८) श्री. राजेश अग्रवाल, सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

(९) डॉ. प्रदीप व्यास, सचिव, वित्त विभाग,

(१०) श्री. गं.म.कंधारे, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,

(११) श्री. सुब्रत रथो, सचिव, ऊर्जा,

(१२) श्री. आर.जी.सय्यद, उप सचिव, ग्रामविकास विभाग.

**जिल्हा परिषद, ठाणे :**

(१) श्री. एच.के.जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी,

(२) श्री. रवींद्र शिंदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

(३) श्री. पां.द.करवंदे, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे,

(४) श्री. अशोक पवार , वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपूर पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात ठाणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग,प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, कृषी विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, सचिव, वित्त विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, ऊर्जा विभाग, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे यांची साक्ष घेतली.

## गुरुवार, दिनांक ९ डिसेंबर, २०१०
## स्थळ : विधान भवन, नागपूर

उपस्थिती

(१) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

(३) श्री. बच्चु उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

(४) श्री. विष्णु सावरा, वि.स.स.

(५) श्री. विजयराव औटी, वि.स.स.

(६) श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

(७) श्री..नितीन भोसले, वि.स.स.

(८) ॲड. उषा दराडे, वि.प.स.

(९) श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

(१०) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव,

(२) श्री. विलास आठवले, अवर सचिव,

(३) श्री. सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत समितीच्या दुसऱ्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करून ते किरकोळ सुधारणासह संमत केले.

शामुना--एचबी-२२२६-मविसना-१२-२०१०-७६० प्रती-पीए ५*